प्रेसनोट                                        दिनांक ३०/१०/२०२५

सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हा अधिकारी, ठाणे शहर येथील वरीष्ठ लिपीक व खाजगी इसम यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्याबाबत.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :– | ठाणे |
| तक्रारदार | :– | पुरुष, वय– ७३ वर्षे |
| लोकसेविका यांचे नाव व कार्यालय | :– | १)लोकसेवक दिपक मुधकरराव इसळ, वय ३४ वर्षे, पद– वरीष्ठ लिपीक, सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुंद्राक जिल्हा अधिकारी, ठाणे शहर राहणार – १७०४, १७ वा माळा, डाफोडील, बाळकुम, ठाणे ४००६०८ २)खाजगी इसम : अजित विठठल कोकमकर, वय ५० वर्षे, राहणार– सावंत कंपाउड, धोबीघाट, लोकमान्यनगर पाडा नं. ४, रूम नं २०६, वक्रतुंड अपार्टमेन्ट, ठाणे (पश्चिम) |
| तक्रार प्राप्त दिनांक | :– | दिनांक २८/१०/२०२५ रोजी |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | दि. २८/१०/२०२५ रोजीचे पडताळणी कारवाई मध्ये ७०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन त्यात ५००० रूपये कमी करून ६५.०००/– रूपये दोन हफ्त्यात स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न. |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | दि. ३०/१०/२०२५ रोजी ३५,०००/– रुपये खाजगी इसम यांनी स्वीकारले. |
| थोडक्यात हकीकत | :– | तक्रारदार यांची आई हिने सन १९८७ साली तिच्या नावे शांती विहार नगर, भाईदर (पश्चिम) येथे जयलक्ष्मी को. ऑप हौ सोसायटी, येथे १४५ स्केअर फुट लांबी रूंदीचा गाळा नं ११ खरेदी केला होता. सन २००८ साली शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या अभय योजना २००८ अंतर्गत अनाधिकृत मालमत्ता शासकीय शुल्क व दंड भरून अधिकृत करुन घेण्यासाठी तक्रारदार यांची आईने जयलक्ष्मी को. ऑप हौ सोसायटी, गोडदेव नाका, भाईंदर पुर्व, येथील गाळा नं ११, या खरेदी केलेल्या गाळयाचे मुळ खरेदीखत हे सन २००९ मध्ये सह निबंधक वर्ग १, ठाणे कार्यालयात जमा केले होते. सदरचे मुळ खरेदीखत मिळविण्यासाठी तक्रारदार हे सह निबंधक वर्ग १, ठाणे कार्यालयात जावून संबंधित काम पाहणारे कर्मचारी लिपिक श्री. दिपक इसळ यांना भेटून त्याबाबत त्यांचेकडे पाठपुरावा करत होते. त्याप्रमाणे सदरचे मुळ खरेदीखत तक्रारदार यांना देण्यासाठी लोकसेवक श्री. दिपक इसळ, क्लार्क यांचे सांगण्यावरुन खाजगी इसम अजित कोकमकर यांनी तक्रारदार यांना दि. ०६/१०/२०२५ रोजी एका कागदावर कामासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे लिहून त्याचे पाठीमागे ३५०००, ३५००० असे इंग्रजीत आकडे लिहून मुळ खरेदीखत हवे असल्यास त्यांना एकूण ७०,०००/– रु. लागतील असे सांगितले होते. त्याबाबत तक्रारदार श्री. तिवारी यांनी दि. २८/१०/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालय येथे लेखी तक्रार दिली होती.<br>त्याप्रमाणे तक्रारदार यांचे दि. २८/१०/२०२५ रोजीचे तक्रारी प्रमाणे लोकसेवक श्री. दिपक इसळ व खाजगी इसम श्री. अजित कोकमकर हे त्यांनी तक्रारदार यांना दि. ०६/१०/२०२५ रोजी कागदावर लिहून दिलेल्या ७०,०००/– रुपये लाचेचे रक्कमेमध्ये तडजोड करुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी केली असता, तक्रारदार यांना त्यांचे वरील नमुद गाळयाचे मुळ खरेदीखत देण्यासाठी खाजगी इसम श्री. अजित कोकमकर यांनी लोकसेवक श्री. दिपक इसळ यांचेकरीता तक्रारदार यांना कागदावर लिहून दिलेल्या ७०,०००/– रु. रक्कमेमध्ये ५०००/– रु. कमी करुन तडजोडअंती तक्रारदार श्री. तिवारी यांचेकडे ६५,०००/– रु. लाचीची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम दोन टप्प्यामध्ये स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्याअनुषंगाने दि. ३०/१०/२०२५ रोजी आजमविण्यात आलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम श्री. अजित कोकमकर यांना लोकसेवक श्री. दिपक इसळ, वरिष्ठ लिपिक, सह निबंधक वर्ग १, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकरीता तक्रारदार श्री. तिवारी यांचेकडून ३५,०००/– रु. लाचेची रक्कम स्विकारताना १४:५५ वाजता रंगेहात पकडण्यात आले असून, सदर कारवाईमध्ये लोकसेवक श्री. दिपक इसळ, यांचाही सहभाग असल्याने त्यांनाही ताब्यात घेण्यात आलेले आहे. नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२. मा. श्री. भागवत सोनावणे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in, Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसुअॅप्स् क्रमांक – ९७६९६९१०६४


( शर्मिला पाटील )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
ठाणे